**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- १ | शनिवार दिनांक १६/२/२००८ |
| ठराव क्रमांक :- १ | शनिवार दिनांक १६/२/२००८ |

**प्रस्तावाचा विषय** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक १४ दिनांक २२/१/२००८ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १५ बुधवार दिनांक ३०/१/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक १४ दिनांक २२/१/२००८ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १५ बुधवार दिनांक ३०/१/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यत्वत्तांत मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- आपले मागिल सभा दिनांक २२/१/२००८ व दिनाक ३०/१/२००८ चे अंदाजपत्रकीय सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे. मा.सदस्यांनी त्याबाबत आपल्या सुचना दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- मा.स्थायी समिती सभा दिनांक २२/१/२००८ रोजीचे सभे मध्ये ठराव क्रमांक बावीस चा ऑफीस रिपोर्ट पहाता प्रभाग क्रमांक २ मधील औरंगाबाद रोड लगतचे पोलीस कॉलनी व अँडेव्होकेट कॉलनी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी आलेले कमीचे निविदा दर धारक यांचे निविदा रकमेपेक्षा सत्तावीस टक्के जादाचे दर मंजूरीस छाननी समितीने शिफारस केलेली आहे.परंतु ठरावामध्ये चुकीचे २९.९०% ( एकोणतीस पूर्णांक सतरा शतांश ) असे लिहिलेले आहे. तो ठराव दूरूस्त करून निविदादर सत्तावीस टक्के असे करावे.

मा.सौ. दिघे वि.रा.:- त्याप्रमाणे दूरूस्ती करणेत यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र :- सभांचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.सौ. दिघे वि.रा. :- दूरूस्ती सह मागील सभांचे कार्यवृत्तांत कायम करणेत यावे.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक २२/१/२००८ ठराव क्रमांक २२ मध्ये,"कमीचे निविदा दर धारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपणी अहमदनगर यांचे निविदा रकमे पेक्षा २९.९० ( एकोणतीस पूर्णांक सतरा शतांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर" या ऐवजी "कमीचे निविदा दर धारक मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपणी, अहमदनगर यांचे निविदा रकमे पेक्षा २७% ( सत्तावीस टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर " या प्रमाणे चुकीचे दुरूस्ती सह मागील सभा क्रमांक १४ मंगळवार दिनांक २२/१/२००८ व सभा क्रमांक १५ बुधवार दिनांक ३०/१/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

**प्रस्तावाचा विषय** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक १४ दिनांक २२/१/२००८ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १५ बुधवार दिनांक ३०/१/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**ठराव :-** मागील सभा दिनांक २२/१/२००८ ठराव क्रमांक २२ अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ औरंगाबाद रोड लगतचे पोलीस कॉलनी व ॲडव्होकेट कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण,डांबरीकरण करणे कामी चे ठरावा मध्ये "मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफीस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे निविदा दर धारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी अहमदनगर यांचे निविदा रकमे पेक्षा २९.९० %(एकोणतीस पूर्णांक सतरा शतांश टक्के)जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत ऑफीस रिपोर्ट मंजूर " या ऐवजी "मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफीस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे निविदा दर धारक मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपणी, अहमदनगर यांचे निविदा रकमे पेक्षा २७% ( सत्तावीस टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर " या प्रमाणे दूरूस्ती सह मा.स्थायी समिती सभा क्रमांक १४ मंगळवार दिनांक २२/१/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ बुधवार दिनांक ३०/१/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शे.र.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे वि.रा.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :- २ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :- २ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३९ चे तरतूदीनुसार श्रीमती अमिनाबी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा, टिळकरोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्द करणे बाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ [ मा.स्थायी समिती सभा दि. ७/१/२००८ ठराव नं. ३ अन्वये पुढील सभे मध्ये निर्णयार्थ घेणे विषयी मंजूरी.]

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना -विषय - श्रीमती अमिना बी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा टिळक रोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्य करणे बाबत.

उपरोक्त विषयानुसार श्रीमती अमिना बी.शेख इस्माईल यांच्या मालकीच्या हजारी गादी कारखाना (कापूस पिंजाई) परवाना रद्य करणे बाबत सदर भागातील नागरिकांच्या वारंवार प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार, संबधित व्यवसाय धारक यांनी उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार म.न.पा.नगररचनाकार यांचे जा.क्र. १६२८ दि.२४/८/०७ ने ना -हरकत प्रमाण पत्र रद्य केले बाबत तसेच म.प्र.वि. मंडळ यांनी सदर व्यवसाय धारकांचे वस्तुस्थिती पाहुन समंती पत्र रद्य केले नुसार संपूर्ण प्रकरण प्रस्ताव सह म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४३९ पॅरा ४ पॅरा ५ चे संक्रमन कालीन तरतुदीनुसार तत्कालीन नगरपरिषदेच्या ॲक्ट १९६५ मधील कलम २८१(२)अ अन्वये परवाना घेवून नुतनीकरण न केले बाबत तसेच कलम २८० प्रमाणे उपविधीमधील कलम८ प्रमाणे गादी कारखान्याचा परवाना रद्य करणे बाबत सदर प्रकरणा बाबत विधी सल्लागार यांचे मतानुसार व मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा दिनांक ५/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री. शिंदे द.बा. :- टिळक रोड भागामध्ये अनेक सॉमिल्स चालू आहेत. त्या पासून उडणा-या भुस्याचा त्रास तेथील रहिवांशाना होत नाही का? या व्यवसायापासून होतो हे कसे.?

मा. उपायुक्त श्री. हांगे साहेब :- प्रदुशन नियंत्रण मंडळाने या व्यवसायाचे संम्मती पत्र रद्द केलेले आहे. म.न.पा.चे नगररचना विभागाने ही एन.ओ.सी. रद्द केलेली आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- त्या भागात चालू असलेल्या सॉ मिल्स आहेत त्यांचे पासून ही प्रदूशन होते.

मा.श्री. शिंदे द.बा.:- व्यावसाया बाबत तेथे खाजगी वाद असेल. प्रस्ताव तहकुब ठेवावा.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- व्यावसायाच्या मालकाशी चर्चा करावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मालकांशी चर्चा करणेत यावी तो पर्यत प्रस्ताव तहकुब ठेवावा.

मा.सभापती साहेब :- व्यावसायाचे मालक यांना सभे मध्यें बोलावून घ्यावे त्यांचेशी चर्चा करावी.प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यात यावा.तो पर्यत सदरचा प्रस्ताव हा तहकुब ठेवावा.

**ठराव** :- तहकुब

सुचक :- मा.श्री. शिंदे द.बा.
अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ.शे.र.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८

विषय क्रमांक :- ३ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :- ३ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी येथील चौकात श्री. संभाजी महाराज यांचा उभा पूर्णाकृती ब्रान्झ पुतळा उभारणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- अहमदनगर महानगरपालिका श्री. संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा पुरवठा निविदा मंजूरी बाबत.

टिप्पणी- विनंती रिपोर्ट सादर की, मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.२ दि. २१/७/२००७ अन्वये प्रोफेसर कॉलनी येथील चौकात उभा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत तसेच मा. शासनाचे परवानगीसाठी नियामाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास मंजूरी दिलेली आहे.

त्याप्रमाणे श्री. संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा पुरवठयाबाबत दै.सकाळ दि.२९/९/२००७ व दै. लोकसत्ता दि. २९/९/२००७ चे अंकात व अहमदनगर महानगरपालिका वेबसाईट क्र. WWW.amc.Gov.in वर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करून दि. १/१०/२००७ ते दि. १२/१०/२००७ अखरे टेंडर फॉर्म विक्री ठेवून दि..१६/१०/२००७ रोजी दु. २.०० वाजेपर्यत निविदा मागविल्या असता.

निविदा सादरी करणाच्या मुदतीत-

१] में. एस.बी. परदेशी आर्टस स्टुडिओ, पुणे.
२] में. विक्रांत मांजरेकर, मुंबई.
३] में. कलाश्री क्रीयेशन्स, प्रा.लि. अहमदनगर.
४] में. कलानिर्मीती क्रीयेशन्स, अहमदनगर.

या प्रमाणे चार निविदा प्राप्त झालेल्या असून त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदाकाराचे नाव | श्री. संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा | देकार रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १. | में. एस.बी. परदेशी आर्टस स्टुडिओ, पुणे. | साईज- ९'.६"<br>साईज- १२'.६" | रू. ८,७३,०००/-<br>रू. १०,७०,०००/- |
| २. | में. विक्रांत मांजरेकर, मुंबई. | साईज- ९'.६"<br>साईज- १२' | रू. ७,९५,०००/-<br>रू. १२,७५,०००/- |
| ३. | में. कलाश्री क्रीयेशन्स, प्रा.लि. अहमदनगर. | साईज- ९'.६"<br>साईज- १२' | रू. १७,००,०००/-<br>रू. २२,००,०००/- |
| ४. | में. कलानिर्मीती क्रीयेशन्स, अहमदनगर. | साईज- ९'.६"<br>साईज- १२' | रू. १८,००,०००/-<br>रू. २१,००,०००/- |

निविदा सादरी करणापूर्वीच्या ( प्री. बीड) बैठकीमध्ये ठरल्या प्रमाणे निविदाकार यांनी दाखल केलेल्या पुतळयाचे लहान नमुना मॉडेल, क्ले मॉडेल व निविदाकार यांनी कार्यादेशानंतर तयार केलेला पुतळा पसंती करिता महानगरपालिका स्तरावर मा. महापौर साहेब यांनी दि. ५/१२/२००७ चे पत्रान्वये दहा सदस्यीय समिती गठित करण्यात आल्याचे व में. एस.बी. परदेशी आर्टस स्टुडिओ, पुणे यांनी श्री. संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा साईज-१२'.६" पुरवठयाकरिता दाखल केलेले नमुना लहान मॉडेल प्रमाणे या पुतळयास पसंती दिल्याचे समिती सदस्यांचे स्वाक्षरीसह कळविलेले आहे.

निविदाकार एस.बी. परदेशी आर्टस स्टुडिओ, पुणे यांना निविदा दर निगोसिएशन करिता समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित राहुन त्यांनी दि. ७/१२/२००७ चे पत्रान्वये निविदा दाखल केल्यानंतर बाजारात पुतळा तयार करण्यासाठी आवश्यक ब्रांझधातू, कोळसा, लाकुड, मेण इ. कच्च्या मालाच्या दरात वाढ झाली असून दिवसेदिवस दरात वाढ होत असल्याने दिलेल्या निविदा दरात रू. १०,७०,०००/- फक्तमध्ये कमी करणेस असमर्थता दर्शविलेली आहे.

मा.नगररचनाकार यांनी शासन निर्णय क्र. स्मारक/ ३१०२/८८४/प्र.क्र. १२२/२००२/२९ दि. २/२/२००५ मधील जागेच्या विविध मुद्दयाबाबतचे निकष विषयांकित जागा पुर्ण करते तसेच या कामी आवश्यक असणारे प्रतिज्ञापत्र/ प्रमाणपत्र इत्यादी चे प्रारूप तयार करण्यात आलेले आहेत. ते स्वतंत्ररित्या मा.जिल्हाधिकारी तसेच मा. पोलीस अधिक्षक यांना पाठविण्यात येत आहेत. असा अभिप्राय दिलेला आहे.

मा.महापौर साहेब यांचे अध्यक्षतेखालील समितीने में. एस.बी.परदेशी आर्टस स्टुडिओ, पुणे यांनी श्री.संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती उभा ब्रांझ पुतळा साईज- १२'.६"पुरवठयाकरिता दाखल केलेले नमुना लहान मॉडेलप्रमाणे या पुतळयास पसंती दिल्यामुळे निविदा दराच्या तुलणात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे..एस.बी.परदेशी आर्टस स्टुडिओ, पुणे यांचा साईज-१२'.६"उंचीचा देकार रक्कम रू.१०,७०,०००/-(रक्कम रू.दहा लाख सत्तर हजार फक्त) स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी आहे.

निविदाकार में. एस.बी. परदेशी आर्टस स्टुडिओ, पुणे यांनी दि. १७/१२/२००७ चे पत्रान्वये छत्रपती संभाजी महाराज पुतळयाचे कामासाठी पुढील प्रमाणे तीन टप्यामध्ये पेमेंट अदा करण्याची मागणी केली आहे.

१] पुतळयाचे क्ले मॉडेल तयार करून ते आपणाकडून, कलासंचालनालयाकडून मान्य झाल्यावर ( ब्रांझ मध्ये रूपातरीत करणेसाठी एकूण रक्कमेच्या ७०% )

२] पुतळयाचे ब्रांझ कास्टींग पुर्ण झाल्यावर ग्रायडिंग / वेल्डींग / फिनिसिंग इत्यादी कामासाठी २०%

३] पुतळा वाहतुक करून नियोजीत जागेवर बसविल्यानंतर उर्वरित रक्कम १०%

मा.स्थायी समितीच्या मंजूरीनंतर शिल्पकार एजन्सी यांनी पुतळा किंमतीच्या ५% डिपॉझिट रक्कम भरून करारनामा करून दिल्यानंतर त्यांना प्रथम पुतळयाचे क्ले मॉडेल तयार करून त्यास मा.कलासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडून मान्यता घेउन सादर करणेबाबत कार्यादेश देणे योग्य होईल.

तसेच मा.शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग स्मारक / ३१०२/८८४/ प्र.क्र.१२२/२००२/२९ दि.२/२/२००५ मधील पुतळे उभारण्यासंबंधीची मार्गदर्शकतत्वे यातील क्रमांक. १ नुसार स्थानिक संस्था मा. शासनाच्या परवानगी शिवाय पुतळे उभारू शकणार नाही असे स्पष्ट केले

आहे. त्यानुसार कार्यवाही करणे योग्य राहील. या शासन निर्णयातील अनुक्रमांक ४ नुसार पुतळयाचे क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेउन मा.शासनाच्या मंजूरीस्तव प्रस्तावासोबत जोडावी असे निर्देश आहेत. त्याप्रमाणे शिल्पकार एजन्सी यांनी पुतळयाच्या क्ले मॉडेलला मा. कला संचालनालयाची मान्यता घेतल्यानंतर प्रस्ताव मा. शासनाच्या मंजूरीस्तव पाठवून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर शिल्पकार एजन्सीला पुतळयाचे क्ले मॉडेल ब्रांझ मध्ये रूपांतरीत करणेसाठी कार्यादेश देणेस व ब्रांझ मध्ये रूपांतरीत करण्याचा खर्च मोठया प्रमाणात असल्याने त्याकामी आवश्यक अग्रीम रक्कम शिल्पकार एजन्सी यांना देणे योग्य वाटते तथापी पुतळयाच्या किंमतीच्या किती टक्के अग्रीम रक्कम देण्यांत यावी याबाबत निर्णयास्तव व त्यानंतर महानगरपालिकेच्या मा. महापौर साहेब यांचे अध्यक्षतेखालील समितीने ब्रांझ मध्ये रूपांतरीत केलेल्या पुतळयाची समक्ष पाहणी करून समितीला पुतळा पसंत असल्यास महानगरपालिका पोहोच पुरवठा करून चबुत- यावर बसवून देणेबाबत ची कार्यवाही करणेसाठी शिल्पकार एजन्सीला कार्यादेश देणे योग्य वाटते.

तरी सदरचा प्रस्तावा मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख श्री. ए.जी. जाधव यांचा अहवाल असे. दि. २१/१/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- शहर अभियंता यांनी प्रस्तावाची माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री.पालवे व्ही.डी.:-सदर कामासाठी जाहिर निविदा मागविल्या असता १] मे.एस.बी परेदशी आर्टस् स्टुडिओ, पुणे २] मे.विक्रांत मांजरेकर, मुंबई ३] मे. कलाश्री क्रीयेशन्स प्रा.लि, अहमदनगर व ४] मे. कलानिर्मिती क्रीयशेन्स अहमदनगर अशा चार निविदा प्राप्त झाल्या. कमीचे निविदा दर धारक मे.एस.बी. परदेशी आर्टस् स्टुडिओ पुणे यांचे यांनी सादर केलेल्या लहान प्रतिमेस दिलेल्या पसंती नुसार त्यांचे श्री. संभाजी महाराज यांच्या पुर्णाकृती उभा ब्रान्झ पुतळा साईज १२'.६" पुरवठया करिता देकार रक्कम रूपये दहालाख सत्तर हजार फक्तचे कमीचे दरास मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सभे पुढे सादर केलेला आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आलेले निविदादर कमीचे असल्याने प्रस्ताव सभेपढे मंजूरी साठी सादर केलेला आहे.

मा. श्री. कोतकर भा.ए. :- आपले नगर मधील प्रसिध्द शिल्पकार श्री. कांबळे यांचे कडून आपण हे काम करून घेउ शकत नाही का. ?

मा. उपायुक्त श्री. हांगे साहेब :- त्यांची जादा रकमेची मागणी होती. मा.आयुक्त साहेबांनी त्यांचे शी चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणे शक्य नसल्याचे सांगितलेले आहे. त्यांचे दर रूपये दहा लाखाने जास्त असल्याने त्यांना मान्यता दिलेली नाही.

मा. श्री. कोतकर भा.ए. :- आलेले कमीचे निविदा दर धारक यांनी वेळेत काम पूर्ण केले नाही तर

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- आपण त्यांचेशी कायदेशीर करारनामा करून घेणार आहोत.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करणेत यावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मंजूर करणेत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी येथील चौकात श्री. संभाजी महाराज यांचा उभा पूर्णाकृती ब्रांन्झ पुतळा उभारणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी येथील चौकात श्री. संभाजी महाराज यांचा उभा पूर्णाकृती ब्रान्झ पुतळा उभारणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफीस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दर धारक मे.एस.बी. परदेशी आर्टस् स्टुडिओ पुणे यांचे श्री. संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती उभा ब्रान्झ पुतळा साईज १२'.६" करिताचे रूपये १०,७०,०००/-( रूपये दहा लाख सत्तर हजार फक्त) चे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. कोतकर भा.ए.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शे.र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :- ४ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :- ४ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :-अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील पारिजात कॉलनी ( गुलमोहर रोड) ते तिरूमला बंगल्या पर्यत ८०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटर करणेचे वाढीव रक्कम रूपये ९,५३,५१२/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.
**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- पारिजात कॉलनी ( गुलमोहर रोड) ते तिरूमला बंगल्या पर्यत ८०० एम.एम. व्यासाची बंद पाईप गटर करणे व वाढीव रकमेस मान्यता मिळणे बाबत.
सविनय सादर,

उपरोक्त विषयानुसार खालील प्रमाणे अहवाल देण्यांत येतो की, सदर काम संबंधीत ठेकेदाराने जा.नं. ४७० च्या वर्कऑर्डर प्रमाणे सुरू केलेले आहे. सदर कामाच्या ठिकाणी प्रत्यक्षात पाहणी केली असता तेथे अंदाजपत्रकीय मापापेक्षा प्रत्यक्षात गटरची खोदाई जास्त करावी लागत आहे. मागील ओपन गटरची लेवल ( राजळे बंगल्याजवळ) पुढे पाणी वाहुन जाण्याच्या दृष्टीने घेतली असता खोदाईत वाढ होत आहे. तसेच जमिनीखाली मुळ अंदाजपत्रकात गृहीत धरलेल्या हार्ड रॉकच्या खोदाई पेक्षा हार्ड रॉक मोठया प्रमाणात लागल्याने व जमिनीत पावसाचे मुरलेले पाणी वाहत असल्याने कामामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. गटरची खोदाई ५ मीटर पर्यत खोल करावी. लागत असल्याने नागरिकांच्या सुरक्षितीतच्या दृष्टीने लेवल प्रमाणे तातडीने पाईप टाकून मुरूमाने बुजवून घेण्याचे आदेश ठेकेदारास दिलेले आहेत.

प्रत्यक्षात कामाचे मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रू. १४,९८,३३४/- इतकी असुन ठेकेदाराचे प्रत्यक्ष झालेले काम पाहता व काम पुर्ण होण्याच्या दृष्टीने फेर अंदाजपत्रक तयार केले आहे अंदाजपत्रकीय रक्कम रू. २४,५१,८४६/- इतका आहे.त्यानुसार रक्कम रू. ९,५३,५१२/-वाढीव खर्च येणार आहे. या मध्ये खोदाई व चेंबर या दोन प्रमुख बाबींच्या खर्चात वाढ होत आहे. सुधारीत अंदाजपत्रकात विट बांधकामाच्या चेंबर ऐवजी आर.सी.सी. चेंबर करणे ( खोलीच्या दृष्टीने) प्रस्तावीत आहे.

सोबत मुळ तसेच सुधारीत अंदाजपत्रक जोडण्यात आले आहे. प्रत्यक्ष कामाच्या निकडी नुसार बदल आवश्यक असल्याने वाढीव रकमेस मंजूरी मिळणे बाबत प्रस्ताव ठेवला आहे. तरी वाढीव रक्कम रू. ९,५३,५१२/- चे खर्चास व कामास मंजूरी मिळणेस सविनय सादर काम सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार गटर दुरूस्ती या लेखा शिर्षकांतर्गत उपरोक्त काम करता येईल तसेच मा. आयुक्त साहेब यांनी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करणे बाबत सुचित केलेले आहेत.

यास्तव अहवाल अवलोकनार्थ तसेच विषय मंजुरीसाठी मा. स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २२/१/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय** :-अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील पारिजात कॉलनी ( गुलमोहर रोड) ते तिरूमला बंगल्या पर्यत ८०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटर करणेचे वाढीव रक्कम रूपये ९,५३,५१२/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- संबंधीत प्रस्तावास मा.स्थायी समितीचे सभेमध्ये पूर्वी मंजूरी दिलेली होती.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- वाढीव खर्चास मंजूरी मागितलेली आहे. सदर रक्कम रूपये ९,५३,५१२/- इतका खर्च कशामुळे वाढला आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- ८०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटर करणेचे काम होते. गटरची खोली (डेफ्थ) वाढलेली आहे. पूर्वी कमी धरलेली होती. खोदाई व चेंबर या बाबींच्या खर्चात वाढ होत आहे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मागिल वेळी सदर कामाचे एस्टीमेट तयार करतांना तसा विचार केला नव्हता का.? एकूण रूपये साडे नउ लाखाचा खर्च वाढला आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- वाढीव खर्चाचा सविस्तर तपशील देण्यांत यावा कोण कोणत्या कामांमुळे खर्च वाढलेला आहे त्याची माहिती द्यावी ते आम्ही पाहू प्रस्ताव तहकुब ठेवावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- तहकुब ठेवा सविस्तर माहिती घ्यावी.

मा.सौ. दिघे वि.रा. :- तो पर्यत तहकुब ठेवावा.

मा.सभापती साहेब :- पुढील सभेमध्ये सदर प्रकरणी सविस्तर माहिती देण्यांत यावी सर्वानुमते प्रस्ताव तहकुब ठेवावा.

**ठराव :-** सदर प्रकरणी मा.सदस्यांचे मागणी प्रमाणे वाढीव खर्चाची सविस्तर माहिती देण्यांत यावी. तो पर्यत प्रस्ताव तहकुब ठेवण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शे.र.

अनुमादेक :- मा.सौ. दिघे वि.रा.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**

सन २००७-२००८.

विषय क्रमांक :- ५ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :- ५ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५ मधील महात्मा फुले चौक ते सारसनगर भिंगारनाला पुलादरम्यान रस्त्याचे खडीकरण करणे आर.सी.सी. ची बंद पाईप गटर करणे व रस्ता सिमेंट कॉक्रीटकरणेचे कामास व एस्टीमेंट रूपये १५,९९,४०५/-चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचामजकुर:-**प्रस्तावना-विषय-प्र.क्र.५मधील महात्मा फुलेचौक ते सारसनगरभिंगारनाला पुलादरम्यान रस्त्याचे खडीकरणकरणे आर.सी.सी.बंदपाईप गटर व रस्ता सिमेंटकॉक्रीट रस्ता तयार करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार खालील प्रमाणे अहवाल देण्यांत येतो की, प्र.क्र. ५ मधील महात्मा फुले चौक ते सारसनगर भिंगारनाला पुला दरम्यान रस्त्याचे खडीकरण करणे आर.सी.सी. बंद पाईप गटर व सिमेंट कॉक्रीट रस्ता तयार करणे बाबत नागरिकांनी मागणी केली असुन दि. १८/१२/०७ रोजी मा.सर्व साधारण सभेमध्ये सदरचे काम करणे बाबत मा.नगरसेवकांनी सुचना केल्यावरून सभेमध्ये सदर कामी चर्चा होवुन वरील काम करणे बाबत सुचना केलेली आहे. तसेच काही दिवसापूर्वी सारसनगर भागातील शिष्टमंडळ मा.आयुक्त व मा. महापौर यांना भेटून वरील विषयाच्या कामांबाबत वारंवार मागणी केली आहे.

त्यानुसार सदर भागात समक्ष पाहणी करून मोजमाप घेवुन सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. १५,९९,४०५/- इतका खर्च अपेक्षित असुन काम सन २००७-२००८च्या दरसुची नुसार रस्ते दुरूस्ती या लेखा शिर्षकांतर्गत महानगरपालिका फंडातून उपरोक्त काम करता येईल मान्यतेस्तव सविनय सादर. तसेच मा. आयुक्त साहेब यांनी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करणे बाबत सुचित केलेले आहेत.

यास्तव अहवाल अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे . दि. २५/१/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सौ.रवरपुडे ज.सु. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करणेत यावा.

मा.सौ. पवार सं.बा. :- मंजूर

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५ मधील महात्मा फुले चौक ते सारसनगर भिंगारनाला पुला दरम्यान रस्त्याचे खडीकरण करणे आर.सी.सी. ची बंद पाईप गटर करणे व रस्ता सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये १५,९९,४०५/- ( रूपये पंधरा लाख नव्याण्णव हजार चारशे पांच फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे ज.सु.

अनुमादेक :- मा.सौ. पवार सं.बा.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :- ६ शनिवार दिनांक १६/२/२००८ ठराव

क्रमांक :- ६ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५ मधील सारसनगर भागातील मुनोत कॉलनी, सचिननगर, सारस कॉलनी, संदीप नगर तसेच श्रीकृष्ण ट्रेडर्स ते त्रिमुर्ती चौक ते नाल्या दरम्यान रस्त्याचे मजुबती करण, डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये १८,५६,६४५/-चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- प्र.क्र..५मधील सारसनगर भागातील मुनोत कॉलनी, सचिननगर, सारस कॉलनी, संदीप नगर तसेच श्रीकृष्ण ट्रेडर्स ते त्रिमुर्ती चौक ते नाल्या दरम्यान रस्त्याचे मजुबती करण व डांबरीकरण करणे.,सविनय सादर,

उपरोक्त विषयानुसार खालील प्रमाणे अहवाल देण्यांत येतो की, प्र.क्र. ५ मधील सारसनगर भागातील मुनोत कॉलनी, सचिननगर, सारस कॉलनी, संदीप नगर तसेच श्रीकृष्ण ट्रेडर्स ते त्रिमुर्ती चौक ते नाल्या दरम्यान रस्त्याचे मजुबती करण व डांबरीकरण करणे बाबत नागरिकांनी मागणी केली असुन दि. १८/१२/०७ रोजी मा.सर्व साधारण सभेमध्ये सदरचे काम करणे बाबत मा.नगरसेवकांनी सुचना केल्यावरून सभेमध्ये सदर कामी चर्चा होवुन वरील काम करणे बाबत सुचना केलेली आहे. तसेच काही दिवसापूर्वी सारसनगर भागातील शिष्टमंडळ मा.आयुक्त व मा. महापौर यांना भेटून वरील विषयाच्या कामांबाबत वारंवार मागणी केली आहे.

त्यानुसार सदर भागात समक्ष पाहणी करून मोजमाप घेवुन सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. १८,५६,६४५/- इतका खर्च अपेक्षित असुन काम सन २००७-२००८च्या दरसुची नुसार रस्ते दुरूस्ती या लेखा शिर्षकांतर्गत महानगरपालिका फंडातून उपरोक्त काम करता येईल मान्यतेस्तव सविनय सादर. तसेच मा. आयुक्त साहेब यांनी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करणे बाबत सुचित केलेले आहेत.

यास्तव अहवाल अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे . दि. २५/१/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सौ. पवार सं.बा. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करणेत यावा.

मा.सौ.खरपुडे ज.सु.:- मंजूर

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.५मधील सारसनगर भागातील मुनोत कॉलनी,सचिननगर, सारसकॉलनी,संदीपनगर तसेच श्रीकृष्ण ट्रेडर्स ते त्रिमुर्तीचौक ते नाल्यादरम्यान रस्त्याचे मजुबतीकरण,डांबरीकरण करणेचे कामास व एस्टीमेंट रू.१८,५६,६४५/-(रूपये अठरा लाख छपन्न हजार सहाशे पंचचाळीस फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफीस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ.पवार सं.बा.

अनुमादेक :- मा.सौ. खरपुडे ज.सु.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक :- ७ | शनिवार दिनांक १६/२/२००८ |
| ठराव क्रमांक :- ७ | शनिवार दिनांक १६/२/२००८ |

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५ मधील सारसनगर भागातील गाडेकर चौक विक्रांत प्रोव्हिजन ते गणेश औसरकर चिपाडे मळा वैष्णवी चरण अपार्ट मेंट दरम्यान रस्ता डांबरी करण करणे व ३०० एम.एम. व्यासाची पाईप गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ३६,८८,३०५/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- प्र.क्र..५मधील सारसनगर भागातील गाडेकर चौक विक्रांत प्रोव्हिजन ते गणेश औसरकर चिपाडे मळा वैष्णवी चरण अपार्ट दरम्यान रस्ता डांबरीकरण करणे व ३०० एम.एम. व्यासाची पाईप गटर करणे.

सविनय सादर,

उपरोक्त विषयानुसार खालील प्रमाणे अहवाल देण्यांत येतो की, प्र.क्र. ५ मधील सारसनगर भागातील गाडेकर चौक विक्रांत प्रोव्हिजन ते गणेश औसरकर चिपाडे मळा वैष्णवी चरण अपार्ट दरम्यान रस्ता डांबरीकरण करणे व ३०० एम.एम. व्यासाची पाईप गटर करणे बाबत नागरिकांनी मागणी केली असुन दि. १८/१२/०७ रोजी मा.सर्व साधारण सभेमध्ये सदरचे काम करणे बाबत मा.नगरसेवकांनी सुचना केल्यावरून सभेमध्ये सदर कामी चर्चा होवुन वरील काम करणे बाबत सुचना केलेली आहे. तसेच काही दिवसापूर्वी सारसनगर भागातील शिष्टमंडळ मा.आयुक्त व मा. महापौर यांना भेटून वरील विषयाच्या कामांबाबत वारंवार मागणी केली आहे.

त्यानुसार सदर भागात समक्ष पाहणी करून मोजमाप घेवुन सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३६,८८,३०५/- इतका खर्च अपेक्षित असुन काम सन २००७-२००८च्या दरसुची नुसार रस्ते दुरूस्ती या लेखा शिर्षकांतर्गत महानगरपालिका फंडातून उपरोक्त काम करता येईल मान्यतेस्तव सविनय सादर. तसेच मा. आयुक्त साहेब यांनी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करणे बाबत सुचित केलेले आहेत.

यास्तव अहवाल अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे . दि. २५/१/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५ मधील सारसनगर भागातील गाडेकर चौक विक्रांत प्रोव्हिजन ते गणेश औसरकर चिपाडे मळा वैष्णवी चरण अपार्ट मेंट दरम्यान रस्ता डांबरी करण करणे व ३०० एम.एम. व्यासाची पाईप गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ३६,८८,३०५/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा. श्री. कोतकर भा.ए.:- गटरसह रस्ता करणे आहे.?

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- गटर व रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- गटर व डांबरीकरणाचा खर्च वेगवेगळा सांगावा.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- सदर दोनही कामाचे एस्टीमेट एकत्रीत केलेले आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- खर्च वेगवेगळा सांगावा संबंधीत शाखा अभियंता यांना सभेत बोलावण्यांत यावे. सदरचे कामाची आवश्यकता आहे का. ?

शाखा अभियंता श्री. काकडे एम.डी. :- सदरचे गटर व रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करणे आवश्यक असून सदर कामाचे एस्टीमेट करतांना डांबरीकरणासाठी रूपये ३१ लाख ५७ हजार व गटर साठी रूपये ३ लाख ५४ हजार चे एस्टीमेट केलेले आहे.

मा. श्री. कोतकर भा.ए.:- प्रस्ताव मंजूर करणेत यावा.

मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर

मा.श्री. शिंदे द.बा. :- मंजूर

मा. सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५ मधील सारसनगर भागातील गाडेकर चौक विक्रांत प्रोव्हिजन ते गणेश औसरकर चिपाडे मळा वैष्णवी चरण अपार्ट मेंट दरम्यान रस्ता डांबरी करण करणे व ३०० एम.एम.व्यासाची पाईप गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ३६,८८,३०५/- (रूपये छत्तीस लाख अठठयाऐंशी हजार तीनशे पाच फक्त ) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. दिघे वि.रा.

अनुमादेक :- मा.श्री. शिंदे द.बा.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-८ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-८ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्र. ११ सावेडी गावठाण मधील पूर्वीचे नादूरूस्त शौचालयाचे जागी नवीन शौचालय बांधणेचे कामास व एस्टीमेट रूपये ५,८६,७१४/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ११ मध्ये सावेडी गावठाण अंतर्गत भागात सार्व.शौचालय बांधणे.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये अहवाल देण्यांत येतो की, प्र.क्र. ११ मध्ये सावेडी गावठाण अंतर्गत भागात सार्व. शौचालय बांधणे बाबत मा. नगरसेवक श्री. बहिरनाथ तुकाराम वाकळे यांनी काम करणे बाबत सुचिवले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता पुर्वीचे नादुरूस्त असलेले शौचालय अत्यंत खराब झालेले असुन त्या ठिकाणी नवीन शौचालय बांधणे आवश्यक आहे. त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५,८६,७१४/- इतकी आहे. अंदाजपत्रक सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार असुन मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखा शिर्षकांतर्गत महानगरपालिका फंडातून प्रस्तावीत आहे. या प्रस्तावास समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा. स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सौ. पवार सं.बा. :- प्रस्ताव मंजूर करणेत यावा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- मंजूर.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्र. ११ सावेडी गावठाण मधील पूर्वीचे नादूरूस्त शौचालयाचे जागी नवीन शौचालय बांधणेचे कामास व एस्टीमेट रूपये ५,८६,७१४/- ( रूपये पाच लाख शहाऐंशी हजार सातशे चौदा फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. पवार सं.बा.

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे द.बा.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-९ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-९ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्र. ११ सावेडी गावा मधील श्री. शिंदे घर ते करपे घर ते चेमटे घरादरम्यान रस्ता सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ५,९४,५५०/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ११ मध्ये सावेडी गावठाण अंतर्गत शिंदे घर ते करपे घर ते चेमटे घरादरम्यान रस्त्याचे सिमेंट कॉक्रीट करणे.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये अहवाल देण्यांत येतो की, प्र.क्र. ११ मध्ये सावेडी गावठाण अंतर्गत शिंदे घर ते करपे घर ते चेमटे घरादरम्यान रस्त्याचे सिमेंट कॉक्रीट करणे बाबत मा. नगरसेवक श्री. बहिरनाथ तुकाराम वाकळे यांनी काम करणे बाबत सुचिवले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी पूवीचा रस्ता अत्यंत खराब झालेला असुन त्या ठिकाणी नागरिकांच्या सोयीसाठी नवीन रस्ता करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५,९४,५५०/- इतकी आहे. अंदाजपत्रक सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार असुन मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखा शिर्षकांतर्गत महानगरपालिका फंडातून प्रस्तावीत आहे. या प्रस्तावास समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा. स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सौ. दिघे वि.रा. :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करणेत यावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मंजूर

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्र. ११ सावेडी गावामधील श्री. शिंदे घर ते करपे घर ते चेमटे घरादरम्यान रस्ता सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ५,९४,५५०/- ( रूपये पाच लाख चौ-यान्नव हजार पाचशे पन्नास फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. दिघे वि.रा.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शे.र.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-१० शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-१० शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्र. ११ मधील सावेडी गांवामधील श्री. केंद्रे घर ते मेन गटर तसेच श्री. कारपे घर ते श्री.शिंदे घरादरम्यान ३००mm व्यासाची आर.सी.सी. एन.पी-२ क्लास बंद पाईपची गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये १,३४,९११/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. ११ मध्ये सावेडी गावठाण अंतर्गत ३०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी. एन.पी.-२ क्लास बंद पाईप गटर करणे.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये अहवाल देण्यांत येतो की, प्र.क्र. ११ मध्ये सावेडी गावठाण अंतर्गत ३०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी. एन.पी.-२ क्लास बंद पाईप गटर करणे बाबत मा. नगरसेवक श्री. बहिरनाथ तुकाराम वाकळे यांनी काम करणे बाबत सुचिवले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता श्री. केंद्रे घर ते मेन गटर तसेच करपे घर ते शिंदे घरादरम्यान बंद पाईप गटर करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. १,३४,९११/- आहे. अंदाजपत्रक सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार असुन मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखा शिर्षकांतर्गत महानगरपालिका फंडातून प्रस्तावीत आहे. या प्रस्तावास समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा. स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. यांचा अहवाल असे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. शिंदे द.बा.:-माझे वॉर्डामधील मागासवर्गीय कल्याणकारी योजने मधून कामे करावी म्हटले तर निधी नसल्याचे सांगतात.

मा.सभापती साहेब :- नवीन अंदाज पत्रकीय तरतूदी मधून आपला कामे होतील.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. पवार सं.बा. :- मंजूर

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील सावेडी गांवामधील श्री. केंद्रे घर ते मेन गटर तसेच श्री. कारपे घर ते श्री.शिंदे घरादरम्यान ३००mm व्यासाची आर.सी.सी. एन.पी-२ क्लास बंद पाईपची गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये १,३४,९११/- ( रूपये एक लाख चौतीस हजार नउश्शे अकरा फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे ज.सु.

अनुमोदक :- मा.सौ. पवार स.बा.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**

सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-११ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-११ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली कामी दिनांक १/४/२००८ ते ३१/३/२००९ या एक वर्षाचे कालावधी साठी जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये ५२,८७,६०,०००/- निश्चित करून जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**टिप्पणी-विषय-अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली कामी दि. १/४/२००८ ते ३१/३/२००९ या एक वर्षाचे कालावधीसाठी जकात ठेक्याची रक्कम रूपये ५२,८७,६०,०००/- देकार रक्कम निश्चित करून जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविणे बाबत.

अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर सन २००७-२००८ मध्ये मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई यांची नेमणूक केलेली असून त्या वर्षाची ठेक्याची देकार रक्कम रूपये ४७,१६,००,०००/- व एम.आय.डी.सी. मधील एल व एम ब्लॉक जकात हद्दीमधून वगळणेपर्यत वार्षिक देकार रक्कम रूपये ५९,९२,०१२/-व मनपाची प्रशासकीय इमारत बांधून देणेबाबत निश्चित केलेली रक्कम रूपये १,२५,००,०००/- एवढी निश्चित केली होती. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/३/२००८ रोजी संपत आहे.

दि. १/४/२००८ ते ३१/३/२००९ या वर्षाकरिता जकातीची निविदेसाठी ठेक्याची निश्चित केलेली रक्कम रूपये ५२,८७,६०,०००/- एवढी निश्चित केलेली आहे. तरी प्रस्तावामधील अटी व शर्ती नुसार देकार रक्कम निश्चित करून निविदा मागविणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मान्यतेस्तव सादर केलेला आहे.

येणे प्रमाणे जकात अधिक्षक श्री. डवरे एम.एल यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव संबंधीची माहिती सांगावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- जकात ठेक्याची रक्कम कशी कॅलक्युलेट केली त्याची माहिती सांगावी.

नाका अधिक्षक श्री. डवरे एम.एल. :- अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली करणे कामी सन २००७-२००८ सालाकरिता मे. सहकार एजन्सी मालाड मुंबई यांची नेमणूक केलेली असून त्यांचा देकार रक्कम रूपये सत्तेचाळीस कोटी सोळा लाख फक्तचा जकात ठेका मंजूर केलेला होता त्या ठेक्याचे रकमेमध्ये नियमानुसार दहा टक्के नी वाढ केलेली असून त्या मधून जकात हद्दीतील एम.आय.डी.सी मधील एल व एम ब्लॉक वगळल्याने त्याची रूपये एकोणपन्नास लाख सत्तेचाळीस हजार जकात वसुलीची रक्कम वजा केलेली आहे. तसेच कॅन्टोन्मेट भिंगार यांचेशी केलेल्या कराराप्रमाणे त्यांना द्यावयाच्या रूपये एक कोटी हिश्शाची रक्कम त्या मध्ये जमा धरून सन २००८-२००९ करिता जकात ठेक्याची रक्कम रूपये बावन्न कोटी सत्याऐंशी लाख साठ हजार अशी क्लॅक्युलेट केलेली आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:-सगळयांना समजेल असे बायफर्गेशन करून जकात रक्कम व पारगमन शुल्क ( टोल) याच्या अंदाजित धरलेल्या रकमा सांगाव्यात.

नाक अधिक्षक श्री. डवरे एम.एल. :- त्यामध्ये पारगमन शुल्क रूपये एकोणीस कोटी धरलेले आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा. शासनाचे जकात बंद करणेचे धोरण असलेने पुढे मागे जकात बंद झाली तर आपणांस पारगमन शुल्काचे वसुली साठी टेंडर मागवितांना पारगमन शुल्का पासून मिळणा-या उत्पन्नाची निश्चित आकडेवारीची आवश्यकता लागेल त्यासाठी प्रत्यक्षात किती वाहने शहरातुन पास झाली त्यापासून मिळणारे शुल्क यांची निश्चित आकडेवारी ठरवावी लागेल. जकातीची रक्कम व पारगमन शुल्काची रक्कम ही वेगवेगळी पाहिजे.

नाकाअधिक्षक श्री.डवरे एम.एल.:- पारगमनशुल्काची रक्कम १९कोटी धरलेली होती तसेच म.न.पा.चे करून द्यावयाचे प्रशासकीय इमारतीचे बांधकामाची रक्कम रूपये एक कोटी चाळीस लाख धरलेले आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- रूपये एक कोटी चाळीस लाख चे रकमे मध्ये किती बांधकाम होईल ग्राउन्ड प्लस पहिले मजल्याचे बांधकाम झालेले आहे.

नाका अधिक्षक श्री. डवरे एम.एल. :- इमारतीचे दूसरे मजल्याचे बांधकाम करून घेणे आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- करून घ्यावयाच्या बांधकामाची रक्कम अटी शर्ती मध्ये टाकावी.

मा.श्री. शिंदे द.बा.:- इमारतीची किंमतच टाकावी.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- ऑफीस रिपोर्टा मधील अटी शर्ती वाचून दाखवाण्यात

त्याप्रमाणे नाका अधिक्षक यांनी अटी शर्ती वाचून दाखविल्या.

मा.श्री.तिवारी सु.र. :- अटी शर्ती जास्त असल्यास कमी निविदाकार निविदा भरतील.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- कमीत कमी अटी शर्ती टाकून प्रस्ताव मंजूर करणेत यावा.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- कमीत कमी अटी शर्ती टाकून प्रस्ताव मंजूर करावा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तत्काळ करणेत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसूली कामी दिनांक १/४/२००८ ते ३१/३/२००९ या एक वर्षाचे कालावधी साठी जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये ५२,८७,६०,०००/- निश्चित करणेस तसेच जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागवितांना १] जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा अनुभव व एका वर्षात किमान ३० कोटी रकमेचा जकात वसुलीचा अनुभव असावा.२] जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकाने पुर्ण झालेल्या लगतच्या मागील तीन वर्षात म्हणजेच सन २००४-२००५,२००५-२००६,२००६-२००७ या प्रत्येक वर्षी किमान देकार रकमे इतक्या आर्थिक रकमेची उलाढाल केलेली असावी. व त्यासाठी तीन वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.३] जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकांची भांडवली स्थिती किमान देकार रक्कमेच्या किमान ५ टक्के एवढी असावी व त्यासाठी सन २००६-२००७ या आर्थीक वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विविरण पत्र सादर करणे आवश्यक आहे. ४] संयुक्तपणे ( जॉइंट व्हेंचर) अन्वये सादर केलेली निविदा ग्राहय धरण्यात येवू नये.५] निविदे सोबत बयाणा रक्कमही नियमाप्रमाणे भरून घेण्यांत यावी. अनामत रक्कम भरून घेतांना बँक गॅरंटी किंवा धनादेश किंवा रोख स्वरूपात स्विकारणेबाबत कार्यवाही करताना मुळ कागदपत्रे सादर करणे बंधन कारक ठेवावे तसेच सदर कार्यवाही किमान एक दिवस आगोदर होणे आवश्यक आहे. ६] कोणत्याही प्रकारे देकार रक्कम कमी प्राप्त झाली तर त्या अन्वये जकात अभिकर्ता नियुक्त करणे अथवा नाकारणे बाबत महानगरपालिका मा.शासनाच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करू शकेल. ७] आय.टी. पार्क साठीच्या सवलतीचा मोबदला ठेकेदारास अनुज्ञेय असणार नाही. ८] काचेच्या बांगडयावरील जकात कर माफीस मा. शासनाने मान्यता दिल्यास त्याकामी दिल्या जाणा-या सवलतीचा मोबदला ठेकेदारास अनुज्ञेय असणार नाही. ९] औरंगाबाद रोड येथील बोट टाईप गेस्ट हाउत्रस येथे चालू असलेल्या अ.नगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या दुस-या मजल्याचे संपुर्ण बांधकाम (दारे,खिडाक्या, फरशी व इलेक्ट्रीक

फिटींग इत्यादीसह) ठेक्याच्या कालावधीमध्ये पुर्ण करून देणा-यास निविदेत प्राधान्य देण्यात येईल. सदर बांधकामाचा खर्च रू. एक कोटी चाळीस लाख फक्त (रूपये १.४० कोटी मात्र) अपेक्षित राहील. या अटी शर्तीचा समावेश करून जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. खर्च मंजूर सदर सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता( कालवधी कमी राहिला असल्याने) तातडीने अंमलबजावणी करण्यांत यावी करिता ही सभा सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देतआहे.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसूली कामी दिनांक १/४/२००८ ते ३१/३/२००९ या एक वर्षाचे कालावधी साठी जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये ५२,८७,६०,०००/-( रू.बावन्न कोटी सत्त्याऐशी लाख साठ हजार फक्त) निश्चित करून १] जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकास पूर्वीचा किमान एक वर्षाचा अनुभव व एका वर्षात किमान ३० कोटी रकमेचा जकात वसुलीचा अनुभव असावा. २] जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकाने पुर्ण झालेल्या लगतच्या मागील तीन वर्षात म्हणजेच सन २००४-२००५,२००५-२००६,२००६-२००७ या प्रत्येक वर्षी किमान देकार रकमे इतक्या आर्थिक रकमेची उलाढाल केलेली असावी. व त्यासाठी तीन वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.३] जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकांची भांडवली स्थिती किमान देकार रक्कमेच्या किमान ५ टक्के एवढी असावी व त्यासाठी सन २००६-२००७ या आर्थीक वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले लेखा विविरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.४] संयुक्तपणे ( जॉइंट व्हेंचर)अन्वये सादर केलेली निविदा ग्राहय धरण्यात येवू नये.५] निविदे सोबत बयाणा रक्कमही नियमाप्रमाणे भरून घेण्यांत यावी. अनामत रक्कम भरून घेतांना बँक गॅरंटी किंवा धनादेश किंवा रोख स्वरूपात स्विकारणेबाबत कार्यवाही करताना मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक ठेवावे तसेच सदर कार्यवाही किमान एक दिवस आगोदर होणे आवश्यक आहे. ६] कोणत्याही प्रकारे देकार रक्कम कमी प्राप्त  झाली तर त्या अन्वये जकात अभिकर्ता नियुक्त करणे अथवा नाकारणे बाबत महानगरपालिका मा.शासनाच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करू शकेल.७] आय.टी. पार्क साठीच्या सवलतीचा मोबदला ठेकेदारास अनुज्ञेय असणार नाही.८] काचेच्या बांगडयावरील जकात कर माफीस मा.शासनाने मान्यता दिल्यास त्याकामी दिल्या जाणा-या सवलतीचा मोबदला ठेकेदारास अनुज्ञेय असणार नाही.९]औरंगाबादरोड येथील बोट टाईप गेस्ट हाउत्र्स येथे चालू असलेल्या अ.नगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या दुस-या मजल्याचे संपुर्ण बांधकाम (दारे,खिडाक्या, फरशी व इलेक्ट्रीक फिटींग इत्यादीसह) ठेक्याच्या कालावधीमध्ये पुर्ण करून देणा-यास निविदेत प्राधान्य देण्यात येईल. सदर बांधकामाचा खर्च रू. एक कोटी चाळीस लाख फक्त (रूपये १.४० कोटी मात्र)अपेक्षित राहील.या प्रमाणे अटी शर्तीचा समावेश करून जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.खर्च मंजूर.

सदर सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता( कालवधी कमी राहिला असल्याने) तातडीने अंमलबजावणी करण्यांत यावी करिता ही सभा सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही  करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. कोतकर भा.ए.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे ज.सु.

ऑफिस रिपोर्ट नुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक :-१२ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-१२ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील डॉन बॉस्को कॉलनी अंतर्गत ६०० व ३०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटरचे काम ड्रेनेज दुरूस्ती या लेखा शिर्षका अंतर्गत करणेस व एस्टीमेंट रूपये १८,१९,५४५/-चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.
**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. १ भागामध्ये डॉन बॉस्को कॉलनी अंतर्गत ६०० एम.एम. व ३०० एम.एम. व्यासाची बंद पाईप गटर करणे बाबत.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती अहवाल देण्यांत येतो की, प्रभाग क्र. १ भागामध्ये डॉन बॉस्को कॉलनी अंतर्गत ६०० एम.एम. व ३०० एम.एम. व्यासाची बंद पाईप गटर करणे बाबत.मा. उपायुक्त (सा.) यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करून सादर करण्याचे आदेश दिले. सद्यस्थितीत सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारची सांडपाण्याची विल्हेवाट करण्याची व्यवस्था नसुन ठिकठिकाणी दुंर्गधी युक्त पाणी साचल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे डांस व इतर किटांणुचा उपद्रव वाढलेला आहे. सदर बाबत तेथील नागरिकंानी अंादोलनाचा इशारा म.न.पा. कार्यालयात समक्ष येवुन दिला होता.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी करून ३०० व ६०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी. बंद पाईप गटर टाकणेचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. १८,१९,५४५/- इतकी आहे. तरी खर्चास व कामास मंजूरी मिळणेस सविनय सादर सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार "ड्रेनेज दुरूस्ती" या लेखाशिर्षकांतर्गत उपरोक्त काम करता येईल.या कामासाठी मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा. स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- हे ६०० व ३०० एम.एम. गटर लाईनचे काम कसे काय ? गटरचे काम करणार आहे की ड्रेनेज चे काम आहे.

मा. उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ६०० एम.एम. ची मेन लाईनचे व ३०० एम.एम. लाईन चे काम कॉलनीचे अंतर्गत भागातील आहे हे ड्रेनेज चे काम आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- मंजूर करावे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तात्काळ करणेत यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- मंजूर

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तात्काळ करणे यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक १ मधील डॉन बॉस्को कॉलनी अंतर्गत ६०० व ३०० एम.एम. व्यासाची बंद पाईपची गटरचे काम ड्रेनेज दुरूस्ती या लेखा शिर्षका अंतर्गत करणेस व एस्टीमेंट रूपये १८,१९,५४५/- ( रूपये अठरा लाख एकोणीस हजार पाचशे पंचेचाळीस फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही तत्काळ करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. शिंदे द.बा.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शे.र.
ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**

सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-१३ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-१३ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अर्जदार श्री. विद्ये गणेश गंगाराम यांना कै. बाळासाहेब देशपांडे उदयान येथील जलविहार जवळील भाडे कराराने दिलेल्या कॅन्टीन व मोकळया जागेचे दरमहा भाडे रू. ३,२००/- घेउन दिर्घमुदतीचे भाडे कराराने देणे बाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- अर्जदार श्री. विद्ये गणेश गंगाराम यांनी कै. बाळासाहेब देशपांडे उदयान येथील जलविहार जवळील कॅन्टीन व मोकळी जागेबाबत दीर्घ मुदतीचा भाडे करारनामा करून मिळणे बाबतचा अर्ज.

टिप्पणी- विनंतीपुर्वक अहवाल मार्केट विभागाकडून देण्यांत येतो की, सदर कॅन्टीन व त्यांचे उत्तरेकडील अंदाजित १४x २३ या मोजमापाची मोकळी जागा दरमहाभाडे रू. १,०००/- व अनामत रक्कम रू. १२,०००/-घेवुन तीन वर्ष कराराने मा.स्थायी समिती ठराव क्र. ७० दि. ३/१२/९९ रोजी देण्यांत आलेली आहे.

वरील मुदत संपल्यानंतर भाडेवाढकरवुन म्हणजेच दरमहा भाडे रू.१,२३०/- घेवुन मा.स्थायी समिती ठराव क्र. १६६ दि. १/४/०४ अन्वये तीन वर्षाची मुदत वाढवुन देण्यांत आलेली आहे.

श्री. विद्ये यांनी कराराची मुदत संपली आहे. दीर्घ मुदतीचा भाडे करारनामा करून मिळणे बाबत दि.२५/४/०७ रोजी अर्ज केला आहे.

मा.नगररचनाकार यांनी पाहणी करून त्यांचेकडील जा.नं. २१४४ दि. २४/९/०७ अन्वये अहवाल देउन कॅन्टीनचे मोजमापे २२' x२२' चौ. फुट आहे. व मोकळया जागेचे क्षेत्र १५'x ५०' चौ. फुट आहे. त्या सर्व क्षेत्राला दरमहा भाडे रू. ३,२००/- घेणे योग्य होईल तसेच मुंबई प्रांतिक अधिनियमाच्या कलम ७९ प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी असे या विभागास कळविले आहे.

सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ७९ व नुसार महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षा हून अधिक अशा कोणत्याही कालावधीसाठी पटयाने देणे झाल्यास त्यांस मा.स्थायी समितीची मंजुरीची आवश्यकता आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव घेणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक व करसंकलन अधिकारी यांचा अहवाल असे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविल असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- वसुली अधिक्षक यांनी प्रस्तावाची माहिती सांगावी.

वसुली अधिक्षक श्री. पवळे एन.एम. :- मा.स्थायी समितीचे मंजूरी ने ठराव नं. ७० दि. ३/१२/९९ अन्वये अर्जदार श्री. विद्ये गणेश गंगाराम यांना जलविहार जवळील कॅन्टीन व त्याचे उत्तरे कडील अंदाजे १४'x २३' ची मोकळी जागा दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउत्न तीन वर्षासाठी भाडे कराराने दिलेली होती. मुदत संपले नतर त्यांना सन २००४ मध्ये मुदत वाढवून दिलेली आहे. सदर जागे बाबतचे तक्रारी नुसार त्यांनी केलेले बांधकाम पाडण्यात आले होते. श्री. विद्ये यांना दिलेल्या

जागेची मुदत संपलेने त्यांचे अर्जानुसार जागेचे भाडे ठरविणे साठी नगररचनाकार यांचे कडेस प्रकरण पाठविले. असता त्यांनी कॅन्टीनचे मोजमाप २२'x२२' व १५'x५०' फुट मोकळया जागेचे दरमहा भाडे रू.३२००/-घेणे योग्य घेईल असे कळविले आहे अर्जदार यांना दिर्घ मुदतीच्या भाडेकराराने जागा देणे विषयी प्रस्ताव मंजूरी साठी सादर केलेला आहे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- अर्जदार यांचे मागणी प्रमाणे जागा भाडे कराराने देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- आपण त्यांना किती जागा देत आहोत मोकळी जागा म्हणजे काय?

वसुली अधिक्षक श्री. पवळे एन.एम. :- त्यांना जलविहार जवळील जुने कॅन्टीनची व त्या लगतचे १४' x२३' या मोज-मापाची मोकळी जागा दिलेली होती. कॅन्टीनचे मोजमाप २२'x२२' फूट असून मोकळया जागेचे क्षेत्र १५'x५०' असे आहे. मोकळी जागा म्हणजे बांधकाम पाडलेले जागा होय

मा.सभापती साहेब :- तेथे कसला व्यावसाय चालू आहे.

वसुली अधिक्षक श्री. पवळे एन.एम.:- तेथे कॅन्टीन व ज्युस बार चा व्यावसाय आहे.

मा.श्री. कोतकर साहेब :- प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घ्यावा जागा किती देणे आहे त्याची माहिती द्यावी आम्ही ते पाहून ठरवू.

मा.श्री. शिंदे द.बा. :- पुढील सभेमध्ये निर्णसासाठी घेणेत यावा. तहकुब ठेवावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- तहकुब ठेवावा.

मा. सभापती साहेब :- प्रस्ताव पुढील सभे मध्ये सर्वानुमते निर्णयासाठी घेणेत यावा. मा.सदस्यांचे मागणी नुसार माहिती द्यावी तो प्रस्ताव तहकुब ठेवावा.

**ठराव :-** सदर प्रकरणी आवश्यक ती सविस्तर माहिती देण्यांत यावी. तो पर्यत प्रस्ताव तहकुब ठेवावा. सदरचा प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेणेत यावा.

सुचक :- मा.श्री. शिंदे द.बा.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शे.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-१४ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-१४ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेची शहर बस सेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क गॅरंटी मधून रक्कम रूपये दहा लाख बॅंन्केचे थकीत कर्ज हप्तापोटी भरणेस व सदरहु बॅन्क गॅरंटी अभिकर्ता संस्थेने तीस दिवसाचे आंत पुर्ववत करणे बाबत ऑफीस रिपोर्ट कार्यात्तर मंजूरीस.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- शहर बस वाहतुकीच्या बॅन्क गॅंरंटी बाबत.

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेने शहर बस वाहतूक अहमदनगर प्रवासी व माल वाहतूक सह. संस्था मर्यादित या संस्थेस चालविणेस दिलेली आहे.सदर संस्थेने दि.२४/११/०७ पासून महानगरपालिका रॉयल्टी, शासकीय कर , बॅक हप्ता आर्थिक तोटा होत असल्याचे कारण दाखवून आज अखेर भरलेला नसल्याने मा. महापौर साहेब यांचे दालनात झालेल्या मिटींग मध्ये यातून मार्ग काढणे कामी संस्थेने दिलेल्या रू.२५.००लाखाचे बॅक गॅरटीमधून रू.१०.०० लाख बॅक हप्ता भरणेकामी देणे बाबत सविस्तर रिपोर्टास मा.आयुक्त साहेब यांनी मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे मो.व्हे.जा.क्र. ५१४ दि.२/२/२००८ अन्वये कॅनरा बॅंकेस पत्र देण्यात येवून रू.१५.०० लाखाची बॅंक गॅंरटी घेण्यात येवून रू.१०.०० लाख महानगरपालिकेस कॅनरा बॅंकेचा डि.डी. क्र.०९२६८० / दि. ५/२/२००८ अन्वये थकीत कर्ज हप्त्या पोटी देण्यात आले आहे. तसेच अभिकर्ता संस्थेला बाब क्र.४ नुसार सदरची बॅंक गॅंरटी १ महिन्याच्या आत पूर्ववत करण्याबाबतचे पत्र देखील दिलेले आहे. शहर बस वाहतूक उपक्रमांवर स्थायी समितीचे नियंत्रण राहिल असे करारनामा बाब क्र. १५ मध्ये नमूद केलेले असून सदर प्रस्तावा बाबत मा. स्थायी समिती कडे निर्णयास्तव संपूर्ण प्रकरण सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मॅकेनिकल इंजिनिअर श्री. निकम पी.जे.:- अहमदनगर महानगरपालिकेची शहर बसवाहतुक सेवा अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक सहकारी संस्थेस चालविण्यांस दिलेली आहे त्यांनी बस सेवा सुरू करण्यापूर्वी आपले कडेस रक्कम रूपये पंचवीस लाख बॅंन्क गॅरंटी म्हणून दिलेले आहेत. सदर संस्थेने दिनांक २४/११/२००७ पासून महानगरपालिकेची रॉयल्टी, शासकीय कर तसेच बॅंन्क हप्ता संस्थेस आर्थीक तोटा होत असल्याचे कारण दाखवून भरलेला नाही. मा महापौर साहेब यांचे दालनात झालेल्या मिटींग मध्ये यातून मार्ग काढणे साठी सदर संस्थेने दिलेल्या बॅन्क गॅरंटी मधून बॅंन्केचे कर्ज हप्त्या पोटी रूपये दहा लाख महानगर बॅंन्केत भरण्यांत आलेले आहे व सदर अभिकर्ता संस्थेस सदरची बॅन्क गॅरंटी एक महिन्याचे आत पूर्ववत करणे बाबत पत्र दिलेले आहे. शहर बस वाहतुक उपक्रमावर मा.स्थायी समितीचे नियंत्रण राहिल असे करारनाम्या मध्ये नमुद असल्याने सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरी साठी मा.सभे पुढे सादर केलेला आहे.

मा.सभापती साहेब :- त्यांनी बँन्क गँरटी पूर्ववत करणेस पांच वर्षाची मुदत वाढवून मिळणे बाबत माझ या कडेस पत्र दिलेले आहे.

मॅकेनिकल इंजिनिअर श्री. निकम पी.जे. :- तसे पत्र आमचे कडेस आलेले नाही.

मा.सभापती साहेब :- त्यांचे थकीत हप्त्या बाबत माहिती द्यावी.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे.:- आपण त्यांना बसची तिकीटे छपाई करून देतो ते रोजचे उत्पन्न बँन्केत भरतात दर आठ दिवसांनी जमा असलेल्या रकमेची माहिती बॅन्क आपणांस देते त्या मधून हिशोबा नुसार म.न.पाची रॉयल्टी घेतली जाते त्यांनी दिनांक २४/११/२००७ पासून दैनंदिन भरणा बॅन्केत केलेला नाही ते त्याचे वेगळया खात्यात भरणा करतात.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- त्यांचे एकूण थकबाकीच्या रकमांची माहिती द्यावी.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- त्यांचे कडेस महानगरपालिकेची रॉयल्टी रक्कम रूपये एक लाख पंच्यान्नव हजार शासकीय कर रूपये चौ-यान्नव हजार सहाशे एकतीस व आर टी ओ टॅक्स रूपये एक्यान्नव हजार सहाशे सव्हीस फक्त अशा प्रमाणे त्याचे कडेस च्या थकबाकी च्या रकमा आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- बँन्केच्या कर्जाची जबाबदारी कुनाची आहे. आता आपण बँन्क गॅरंटी मधून रूपये दहा लाख दिलेले आहेत ते तीस दिवसांत बँन्क गॅरंटी कव्हर करणार का?

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- बस म.न.पा.चे नांवावर आहेत. प्रस्ताव कार्योत्तर मंजूरी साठी सादर केलेला आहे. त्यांनी बँन्क हप्ते शासकीय कर आपली रॉयल्टी भरलेली नाही. शहर बस वाहतुकी संबंधी आता निर्णय घ्यावा लागेल.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- बँन्केच्या कर्जाची जबाबदारी म.न.पा.ची आहे शासकीय कर या महिन्यात भरावेच लागतील.

मा. श्री. कोतकर भा.ए.:- बस सेवा चालू राहिली पाहिजे.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- त्या दृष्टीने बॅन्क गॅरंटी मधून रूपये दहा लाख बॅन्केचा कर्ज हप्ता भरलेला आहे.शहर बस वाहतुक सेवा चालू ठेवावी अगर कसे या बाबत निर्णय आपण घेतला पाहिजे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपले शहर बस वाहतुकी संबंधी सविस्तर प्रस्ताव मा .आयुक्त साहेबां कडेस सादर करावा महासभे मध्ये त्यावर निर्णय व्हावा. सदर संस्थेशी केलेल्या करारा मधील अटी शर्ती वाचून दाखविण्यांत याव्यात.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- एकूण अठरा अटी शर्ती आहेत.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- आपला शहर बस सेवा उपक्रम चांगला असून तो चालू राहिला पाहिजे.

मा.श्री.शेख आरिफ शेख र.:- त्यांना बॅन्क गॅरंटी पूर्ववत करणेस दोन महिन्याची मुदत द्यावी ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.खरपुडे ज.सु.- त्यांना बॅन्क गॅरंटी पूर्ववत करणेस मुदत देउन प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब:-सदर प्रकरणी सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सर्वानुमते अहमदनगर महानगरपालिकेची शहर बस सेवा चालविण्यांत दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क गॅरंटी मधून रक्कम रूपये दहा लाख बँन्केचे थकित कर्ज हप्त्या पोटी भरणेस कार्योत्तर मंजूरी देण्यांत यावी. तसेच सदरहू बँन्क गॅरंटी अभिकर्ता संस्थेकडून दोन महिन्याचे आंत पूर्ववत करून घेण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेची शहर बस सेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क गॅरंटी मधून रक्कम रूपये दहा लाख बँन्केचे थकीत कर्ज हप्तापोटी भरणेस व सदरहु बॅन्क गॅरंटी अभिकर्ता संस्थेने तीस दिवसाचे आंत पुर्ववत करणे. विषयी कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेची शहर बस सेवा चालविण्यांस दिलेल्या अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्थेचे बॅन्क गॅरंटी मधून रक्कम रूपये दहा लाख फक्त बँन्केचे थकित कर्ज हप्त्या पोटी भरणेस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

मात्र सदरहू बँन्क गॅरंटी अभिकर्ता संस्थेकडून दोन महिन्याचे आंत पूर्ववत करून घेण्यांत यावी.

सुचक :- मा. श्री शेख आरिफ शेख रफिउद्यीन

अनुमोदक :- मा.सौ.खरपुडे ज.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-१५ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-१५ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६ मधील बुरूडगांव रोड नंदनवन कॉलनी फायनल नं.५२/५४ मधील चाणक्य चौक ते आनंद चौका दरम्यान रस्ते दुरूस्ती या लेखा शिर्षका अंतर्गत रस्त्याचे डांबरी करण करणेचे कामास व एस्टीमेंट रक्कम रूपये १३,७५,६८२/-चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :** प्रस्तावना- विषय- प्र.क्र ६ मध्ये बुरूडगांव रोड नंदनवन कॉलनी फायनल प्लॉट नं.५२/५४ मध्ये चाणाक्य चौक ते आनंद चौका दरम्यान रस्त्याचे डांबरीकरण करणे.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये अहवाल देण्यात येतो की, प्र.क्र.६ मध्ये बुरूडगांव रोड नंदनवन कॉलनी फायनल प्लॉट नं.५२ / ५४ मध्ये चाणाक्य चौक ते आनंद चौका दरम्यान रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत मा. महापौर साहेब यांनी सुचविले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता रस्त्याचे डांबरीकरण करणे गरजेचे आहे. त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. १३,७५,६८२/- इतकी आहे. अंदाजपत्रक सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार रस्ते दुरूस्ती या लेखा शिर्षा अंतर्गत रस्त्याची एकूण लांबी ४०९ मीटर आहे. या प्रस्तावास समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच मंजूरीसाठी मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.सौ. दिघे वि.रा. :- मंजूर.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफीस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६ मधील बुरूडगांव रोड नंदनवन कॉलनी फायनल नं.५२/५४ मधील चाणक्य चौक ते आनंद चौका दरम्यान रस्ते दुरूस्ती या लेखा शिर्षका अंतर्गत रस्त्याचे डांबरी करण करणेचे कामास व एस्टीमेंट रक्कम रूपये १३,७५,६८२/-(रूपये तेरा लाख पंच्याहत्तर हजार सहाशे ब्याऐंशी फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे ज.सु.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे वि.रा.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-१६ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-१६ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेतर्फे दिनांक २२ फेब्रुवारी २००८ ते दिनांक २४ फेब्रुवारी २००८ या कालावधी मध्ये आयोजित केलेल्या चौथ्या राज्यस्तरीय नगर महापौर केसरी व जिल्हास्तरीय कुमार कुस्ती स्पर्धे करिता येणारे अंदाजे रक्कम रूपये ११,९९,५००/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- ४ थी राज्यस्तरीय नगर महापौर केसरी व जिल्हास्तरीय कुमार कुस्ती स्पर्धा आयोजनाकरिता येणा-या अपेक्षित खर्चास मंजूरी मिळणे बाबत.

सविनिय सादर की, दरवर्षी प्रमाणे अहमदनगर महानगरपालिके तर्फे या वर्षीही दि. २२ ते २४ फेब्रुवारी,२००८ या कालावधी राज्यस्तरीय नगर महापौर केसरी व जिल्हास्तरीय कुमार कुस्ती स्पर्धा आयोजित करण्याचे निश्चित केलेले आहे.

या अनुशंगाने क्रीडा व सांकृतिक विभागाने या स्पर्धा अयोजनाकरिता विविध तपशीलवार बाबींवर येणारा अपेक्षित खर्च रक्कम रू. ११,९९,५००/- (अक्षरी रूपये अकरा लाख, नव्याण्णव हजार, पाचशे फक्त) प्रस्ताव मंजूरी मिळणे कामी मा. प्रशासनाकडे सादर केला होता.

तथापी मा. आयुक्त साहेब यांनी सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे मान्यतेस्तव ठेवलेला आहे. तरी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणे कामी सादर.

येणे प्रमाणे क्रीडा प्रमुख श्री. गावडे आर.के.यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफीस रिपोर्ट मंजूर करणेत यावा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता पुढील कार्यवाही तात्काळ करावी .

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.इतिवृत्ताची वाट न पहाता पुढील कार्यवाही तत्काळ करणेत यावी.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिकेतर्फे दिनांक२२फेब्रुवारी२००८ते दि.२४फेब्रुवारी२००८या कालावधी मध्ये आयोजित केलेल्या चौथ्या राज्यस्तरीय नगर महापौर केसरी व जिल्हास्तरीय कुमार कुस्तीस्पर्धे करिता येणारे अंदाजे रक्कम रूपये११,९९,५००/-(रूपये अकरा लाख नव्याण्णव हजार पाचशे फक्त)चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही तत्काळ करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. शिंदे द.बा.
अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शे.र.
ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-१७ शनिवार दिनांक १६/२/२००८

---

ठराव क्रमांक :-१७ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.१ मधील नंदनवन कॉलनी, अप्सरा कॉलनी, गोकुळनगर इत्यादी ठिकाणी ९ मीटर उंचीचे १५० वॅट सोडीयम कंप्लीट फिटींग बसविणेचे कामास व अंदाजे रक्कम रूपये ६३,४१,३९८/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-

अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्र. १ मधील नंदनवन कॉलनी, अप्सरा कॉलनी, गोकुळनगर इ.ठिकाणी ९ मी. उंचीचा टयुबुलर पोल १५० वॅट सोडीयम फिटींग कंप्लीट फिटींग बसविणे बाबत संपूर्ण सर्व्हे करण्यात आला असुन सन २००७-०८ सालचे सार्वजनिक बांधकाम विदयुत विभाग मुंबई यांचे दरसुचीनुसार अंदाजपत्रक बनविण्यात आले होते. अंदाजपत्रका नुसार रक्कम रू. ६३,४१,३९८/ (रक्कम रू.त्रेसष्ट लाख,एक्केचाळीस हजार,तीनशे अठठयाण्णव मात्र) चे खर्च अपेक्षित असुन अंदाजपत्रक शिल्लक नसल्याने तरतूद दि ५/०१/०८ रोजी अनुदानाची तरतूद वाढवून घेतली असुन, अंदाजपत्रकानुसार खर्च रक्कम रू ६३,४१,३९८/ अपेक्षित असुन खर्चास व रिपोर्टास मा.स्थायी समिती सभापती साहेबांची प्रशासकीय मंजूरी मिळण्यास रिपोर्ट आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे इलेक्ट्रीक सुपरवायझर श्री.बाळासाहेब साळवे यांचा अहवाल असे दि.७/२/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिति सांगावी.

मॅकेनिकल इंजि. श्री. निकम पी.जे. :- सदर भागाचा सर्व्हे केला असता प्रभाग क्रामांक १ मधील नंदनवन कॉलनी, अप्सरा कॉलनी गोकुळनगर इत्यादी ठिकाणी ९ मीटर उंचीचे टयूबलर पोल १५० वॅट सोडीयम कंप्लीट फिटींग बसविणेचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले होते. पंरतु अंदाजपत्रकीय तरतूद शिल्लक नसल्याने अंदाजपत्रकाीय तरतूद वाढवून घेतले नंतर खर्च रूपये त्र्येसष्ठ लाख एक्केचाळीस हजार तीनशे अठठयान्नव फक्तचे मान्यते साठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सभापती साहेब :- सदर कामासाठी पूर्वी जाहिर निविदा मागविल्या होत्या. त्यावेळी येणारे खर्चास मा.स्थायी समितीची मंजूरी घेतलेली नव्हती.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- कार्योत्तर मंजूरीने निविदा मागविल्या होत्या.

मा.सौ. दिघे वि.रा. :- आमचे मुकुंदनगर भागाचाही सर्व्हे केला होता मा.उपायुक्त श्री. हांगे साहेबांनीही पहाणी केली होती. तरी ही आमचे वॉर्डा मधील कामे मार्गी लागलेली नाहीत.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब:- होय मुकुंदनगर व नंदनवन कॉलनी इत्यादी भागाची पहाणी मी महानगरपालिकेमध्ये चार्ज घेतले नंतर लगेचच केली होती. तेथिल भयान अंधारी अवस्था पाहिली होती नागरिकांच्या अडचणी,तक्रारी नुसार कामांचे अंदाजपत्रक बनविणेत आले होते. पंरतु अंदाजपत्रकीय तरतूद नसलेने कामे करता आली नाहीत एक-दोन महिन्यात सर्व कामे मार्गी लागतील.

मा.श्री. शिंदे द.बा. :- या प्रस्तावा मधील एरिया वाढवावा माझे वॉर्डात अनेक ठिकाणी तसेच डौले हॉस्पीटल मागील भागात लाईटची सोय नाही. वेळोवेगळी मागणी करूनही एकही हायमॅक्स मिळत नाही.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- मुकुंदनगर गोविंदपुरा इत्यादी भागात लाईटींग ची सोय करावी नंदनवन कॉलनी इत्यादी नवीन भागांना आपण सुविधा देउ शकलेलो नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- श्री. शिंदे साहेबांचे वॉर्डा मधील कामांचे एस्टीमेंट तयार करावे. एप्रिल मध्ये सर्व कामे मार्गी लागतील.

मा.सौ. दिघे वि.रा. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा. इतिवृत्त मंजूरीचा वाट न पहाता सदर बाबत पुढील कार्यवाही तत्काळ करण्यांत यावी.

मा.सौ. पवार सं.बा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. सभेचे कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर प्रकरणी पुढील कार्यवाही तत्काळ करणेत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.१ मधील नंदनवन कॉलनी, अप्सरा कॉलनी, गोकुळनगर इत्यादी ठिकाणी ९ मीटर उंचीचे १५० वॅट सोडीयम कंप्लीट फिटींग बसविणेचे कामास व अंदाजे रक्कम रूपये ६३,४१,३९८/- ( रूपये त्रेसष्ठ लाख एक्केचाळीस हजार तीनशे अठठयान्नव फक्त) चे खर्चास मंजूर देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. दिघे वि.रा.

अनुमोदक :- मा.सौ. पवार सं.बा.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-१८ शनिवार दिनांक १६/२/२००८ ठराव

क्रमांक :-१८ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. १७ मधील संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल ते फुलसौंदर चौक ते बंगाल चौक ते धरती चौक व बारातोटी कांरजा ते केवळ हॉस्पीटल ते रमेश सायकल मार्ट पर्यत रस्त्यावर ४० mm जाडीचे आस्फाल्टीक कॉक्रीट, डांबरी करण करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये .१८,३४,१०७/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय - प्रभाग क्र. १७ मधील संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल ते फुलसौंदर चौक ते बंगाल चौक ते धरती चौक व बारातोटी कांरजा ते केवळ हॉस्पीटल ते रमेश सायकल मार्ट पर्यत ४० एम.एम. जाडीचे अस्फॉल्टीक कॉक्रीट ( डांबरीकरण) करणे.

संदर्भ :- मा. स्थायी समिती सभापती, व प्र.क्र. १७ चे मा. नगरसेवक, यांचे सुचनेनुसार.

उपरोक्त विषय संदर्भिय पत्रान्वये विनंती रिपोर्ट की, प्रभाग क्र. १७ मधील संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल ते फुलसौंदर चौक ते बंगाल चौक ते धरती चौक व बारातोटी कारंजा ते केवळ हॉस्पीटल ते रमेश सायकल मार्ट पर्यत ४० एम.एम. जाडीचे अस्फॉल्टीक कॉक्रीट ( डांबरीकरण) करणे बाबत मा.स्थायी समिती सभापती, व प्र.क्र. १७ चे मा. नगरसेवक, यांनी सुचविले आहे.

सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर भागात १० वर्षा पुर्वीचे डांबरीकरण असून वेगवेगळया खोदाईमुळे रस्ता अत्यंत खराब व नादुरूस्त झाला असल्याने पावसाळयात चिखल होतो. त्यामुळे सदर भागात नविन डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

सन २००७-०८ चे सार्व. बांधकाम नाशिक, विभाग यांचे कडील दरसुची नुसार रक्कम रू. १८,३४,१०७/- चे अंदाजपत्रक असुन सदरचा खर्च सन २००७-२००८ चे अंदाजपत्रकातील शहरातील नविन रस्ते या अंतर्गत खर्च करता येईल. कामाचा तांत्रिक वाव सोबत जोडला आहे. या प्रस्तावास समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. यांनी अहवाल असे दि.७/२/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.सौ. पवार सं.बा. :- मंजूर.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. १७ मधील संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल ते फुलसौंदर चौक ते बंगाल चौक ते धरती चौक व बारातोटी कांरजा ते केवळ हॉस्पीटल ते रमेश सायकल मार्ट पर्यत रस्त्यावर ४० mm जाडीचे आस्फाल्टीक कॉक्रीट (डांबरीकरण) करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये .१८,३४,१०७/-( रूपये अठरा लाख चौतीस हजार एकशे सात फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर .

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे ज.सु.

अनुमोदक :- मा.सौ. पवार सं.बा.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-१९ शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-१९ शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. १९ मधील सनमुन चौक ते पटवर्धन चौक ते लक्ष्मीबाई कांरजा ते चित्रा टॉकीज ते नगर वाचनालय, लक्ष्मी कांरजा ते संपदा पतसंस्था व पटवर्धन चौक ते चितळे रोड तसेच गौरी घुमट परिसरातील डांबरी रस्त्यावर ४०mm जाडीचे आस्फाल्टीक कॉक्रीट (डांबरीकरण) करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये २०,९०,३९०/- चे खर्चास मंजूरी मिळणेत बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना-विषय - प्रभाग क्र. १९ मध्ये सनमुन चौक ते पटवर्धन चौक ते लक्ष्मीबाई कांरजा ते चित्रा टॉकीज ते नगर वाचनालय, लक्ष्मीबाई कांरजा ते संपदा पतसंस्था व पटवर्धन चौक ते चितळे रोड तसेच गौरी घुमट परिसरातील डांबरी रस्त्यावर ४० एम.एम. जाडीचे अस्फाल्टीक कॉक्रीट ( डांबरीकरण) करणे

संदर्भ :- मा.सभागृह नेता, श्री. डागवाले किशोर आसाराम यांची सुचना .

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये अहवाल देण्यांत येतो की, प्र.क्र. १९ मध्ये सनमुन चौक ते पटवर्धन चौक ते लक्ष्मीबाई कांरजा ते चित्रा टॉकीज ते नगर वाचनालय, लक्ष्मीबाई कांरजा ते संपदा पतसंस्था व पटवर्धन चौक ते चितळे रोड तसेच गौरी घुमट परिसरातील डांबरी रस्तावर ४०एम.एम.जाडीचे अस्फाल्टीक कॉक्रीट ( डांबरीकरण) करणे बाबत मा. सभागृह नेता श्री. डागवाले किशोर आसाराम यांनी सुचविले आहे.

सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर भागातील मागील ५ वर्षापुर्वीचे डांबरी करण वेगवेगळया खोदाईमुळे रस्ता अत्यंत खराब व नादुरूस्त झाला असल्याने पावसाळयात चिखल होतो.त्यामुळे सदर भागात नविन डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

सन २००७-२००८ चे सार्व.बांधकाम नाशिक, विभाग यांचे कडील दरसुची नुसार रक्कम रू.२०,९०,३९०/- चे अंदाजपत्रक असुन सदरचा खर्च सन २००७-२००८ चे अंदाजपत्रकातील "शहरातील नवीन रस्ते" या अंतर्गत खर्च करता येईल. कामाचा तांत्रिक वाव सोबत जोडला आहे. या प्रस्तावास समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.
येणे प्रमाणे शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. यांनी अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. १९ मधील सनमुन चौक ते पटवर्धन चौक ते लक्ष्मीबाई कांरजा ते चित्रा टॉकीज ते नगर वाचनालय, लक्ष्मी कांरजा ते संपदा पतसंस्था व पटवर्धन चौक ते चितळे रोड तसेच गौरी घुमट परिसरातील डांबरी रस्त्यावर ४०mm जाडीचे आस्फाल्टीक कॉक्रीट (डांबरीकरण) करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये २०,९०,३९०/- चे खर्चास मंजूरी मिळणेत बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- या डांबरीकरणाचे कामाची आवश्यकता आहे काय.

शाखा अभियंता श्री. सोनटक्के व्ही.जी. :- सदर भागातील रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पांच वर्षापूर्वी झालेले असून डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

मा.सौ. पवार सं.बा. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. १९ मधील सनमुन चौक ते पटवर्धन चौक ते लक्ष्मीबाई कांरजा ते चित्रा टॉकीज ते नगर वाचनालय, लक्ष्मी कांरजा ते संपदा पतसंस्था व पटवर्धन चौक ते चितळे रोड तसेच गौरी घुमट परिसरातील डांबरी रस्त्यावर ४०mm जाडीचे आस्फाल्टीक कॉक्रीट ( डांबरीकरण) करणेचे कामास व एस्टीमेंट रूपये २०,९०,३९०/- (रूपये वीस लाख नव्वद हजार तीनशे नव्वद फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर .

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. पवार सं.बा.

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे ज.सु.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक :-२० शनिवार दिनांक १६/२/२००८

ठराव क्रमांक :-२० शनिवार दिनांक १६/२/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आयूर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर व सारसनगर येथील भिंगार नाल्यावर पुल बांधणे कामी येणारे वाढीव खर्च रूपये १६,२४,८२४/- चे खर्चास व सदर रक्कम मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडेस वर्ग करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** टिप्पणी-विषय- १२ वा वित्त आयोगांतर्गत सारसनगर येथे व आयुर्वेद कॉलेज ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर पुल बांधणेचे कामाकरिता वाढीव खर्चाचा निधी मिळणे बाबत.

संदर्भ :- १] इकडील पत्र क्र.सा.बां. वि. १८८० दि.२/२/०७ चे पत्र जा.क्र. प्रशा/११०३ दि. ९/२/०७

२] मा.कार्यकारी अभियंता, सा.बां. वि.अ.नगर यांचे कडील पत्र

३] इकडील पत्र सा.बां. वि. १२९३ दि. १६/३/०७ चे पत्र.

४]इकडील पत्र क्र. म.न.पा.सा.बां.वि.३०३ दि. २२/५/०७ चे पत्र.

५] मा.कार्यकारी अभियंता ,सा.बां.वि अ.नगर यांचे कडील पत्र प्रशा-३-३३९३दि.३/५/०७

६]इकडील पत्र क्र.म.न.पा.सा.बां.वि. ६१५ दि.३/७/०७ चे पत्र.

७] मा.कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.अ.नगर यांचे कडील पत्र प्रशा-३-५७३३दि.३०/७/०७

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत सारसनगर येथे पुल बांधणे व आयुर्वेद कॉलेज ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सिना नदीवर पुल बांधणेचे काम सार्व. बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन अ.नगर यांचे कडून करून घेणे बाबतचे कार्यालयीन प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव नं.२ दि. २८/२/०७ अन्वये मान्यता देण्यात आली.

अहमदनगर महानगरपालिकेची उपरोक्त दोन्ही कामाचे अंदाजपत्रके ( आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर पुल बांधणेचे रक्कम रू. ४१,७४,४३०/- व सारसनगर येथे भिंगार नाल्यावर पुल बांधणेचे अंदाजपत्रकीय रक्कम रू. २० लाख ) एकूण रक्कम रू. ६१,७४,४३०/- खर्चाचे अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीचे प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानुसार कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग महाराष्ट्र शासन, अ.नगर यांचेकडेस पुलाचे पायाची चाचणी व सर्वेक्षण करणेकामी रू. १,२१,५६८/- ची रक्कम संदर्भिय पत्र.क्र. ६ अन्वये जमा करण्यात आली.

तद्नंतर संदर्भिय पत्र क्र.७ अन्वये मा.कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग अ.नगर यांनी उपरोक्त दोन्ही पुलाचे सन २००७-२००८ च्या मंजूर दरसुची नुसार अंदाजपत्रके तयार केली असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**१] आयुर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा दरम्यान सिना नदीवर पुल बांधणे.**

| | |
|---|---|
| -पुलाची लांबी- | ५० मीटर ( १० मीटरचे ५ गाळे) |
| - पुलाचा प्रकार- | आर.सी.सी |
| -पुलाची उंची | ८.११ मीटर ( पायापासून) |
| -रूंदी- | ७.५ मीटर |
| -जोड रस्त्याची लांबी- | ७६ मीटर्स |

**२] सारसनगर येथील भिंगार नाल्यावरील पुलाचे काम.**

-पुलाची लांबी- ५० मीटर ( ५ मीटरचे ३ गाळे)
- पुलाचा प्रकार- आर.सी.सी . राफ्ट
-पुलाची उंची ४.१२ मीटर ( पायापासून)
-रूंदी- ७.५ मीटर
-जोड रस्त्याची लांबी- ८३ मीटर्स

या व्यतिरिक्त उपरोक्त कामाच्या अंदाजपत्रकामध्ये पर्यायी वळण रस्ता बांधणे, मोरीचे बांधकाम करणे तसेच विदयुत खांब हलविणे या बाबीं समाविष्ठ केल्या आहेत. त्यानुसार दोन्ही पुलांची अनुक्रमे अंदाजित खर्च रक्कम रू. ९२.०० लाख व रक्कम रू. ३३.०० लाख इतकी येत असल्याचे नमुद केले आहे व त्यावर ६.२५ % रक्कम रू. ७.८३ लाख अंदाजपत्रकासाठी सर्वेक्षण व कामाची देखरेख करणे असे एकूण रू. १३३.०० लाख इतका खर्च अपेक्षित आहे. असे कळविले , त्या अनुषंगाने दोन्ही ठिकाणी पुलांचे बांधकाम करणेसाठी रक्कम रू. १३२.८३ लक्षचे धनादेश इतका निधी कार्यकारी अभियंता सा.बां. वि.अ.नगर यांचेकडे वर्ग केले आहे. त्यानुसार विभागीय कार्यालय सा.बां.वि. यांनी वरील दोन्ही कामांसाठी जाहिर निविदा प्रसिध्द केल्या होत्या. निविदा उघडल्यानंतर दोन्ही कामांसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा वाढीव दराच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. संबंधीत ठेकेदारांना वाढीव दरामध्ये कपात करण्यास कळविले असता त्यांचे कडून अल्प दर कमी करण्यात आले आहेत.त्यामुळे वाढीव दर स्विकारणेसाठी निविदा संच वरिष्ठ कार्यालयास सादर करावे लागणार आहे. निविदांचे दर निश्चित करण्यासाठी या कामांना आवश्यक वाढीव रक्कम खात्याकडे जमा करणे अगत्याचे आहे. तरी दोन्ही कामांसाठी खालील प्रमाणे रक्कम वर्ग करावी असे पत्राद्वारे कळविले आहे. तरी दोन्ही कामांसाठी खालील प्रमाणे रक्कम वर्ग करावी लागेल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | आयुर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा रस्त्यावर सिना नदीवर मोठा पुल बांधणे | ९२,९७,६५४/- | १३.३२% जादा | १२,३८,४६४/- |
| २ | सारसनगर येथील भिंगार नाल्यावर पुल बांधणे | ३०,६०,८६८/- | ९.५० % जादा | २,९०,७८२/- |
| | | | एकूण रक्कम रू. | १५,२९,२४६/- |

जादा रक्कम १५,२९,२४६/- + ६.२५ % सेंटेज चार्जेस रू. ९५,५७८/- म्हणजेच रू. १६,२४,८२४/- इतकी रक्कम आहे.

तरी वरील दोन्ही कामाची वाढीव रक्कम रू. १६,२४,८२४/- च्या खर्चास मा.स्थायी समितीची मंजुरी घेवुन कार्यकारी अभियंता सा.बां. वि. यांचेकडे सदरची रक्कम वर्ग करावी लागणार आहे. तरी रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. यांनी अहवाल असे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सदरचे कामासाठी आपण किती रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडेस वर्ग केलेली आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- एकूण रूपये एक कोटी तेहतीस लाख वर्ग केलेले आहेत.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- या वाढीव खर्चास मंजूरी कशासाठी .

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- सदर कामांचे अंदाजपत्रका प्रमाणे आपण त्यांचे कडेस रक्कम वर्ग केल्या नंतर सार्व. बांधकाम विभाग यांनी सदर कामाच्या जाहिर निविदा मागविल्या असता सदर कामाच्या १३.३२ % व  ९.५० % अशा वाढीव दराच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. वाढीव दर मंजूरी साठी वरीष्ठ कार्यालयास प्रस्ताव सादर करावे लागणार आहेत. सदरचे कामासाठी आलेल्या वाढीव दराप्रमाणे रक्कम रूपये सोळा लाख च्योवीस हजार आठशे च्योवीस फक्त कार्यकारी अभियंता सा.बां. वि. यांचे कडेस वर्ग करणे बाबत त्यांनी कळविले आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव मंजूरी साठी सादर केलेला आहे.

मा.श्री.कोतकर भा.एः-सदर रक्कम त्यांचे कडेस वर्ग केले नंतर पुलांची कामे लगेच होणार आहेत का?

मा.श्री. तिवारी सु.र. :- या पुलांचे कामांचे मुळ अंदाजपत्रक रूपये त्रेसष्ठ लाख एवढेच होते आता ते दीड कोटी झालेले आहे. आपण अशी किती रक्कम वाढवून देणार .

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- सदर कामाच्या प्रथम निविदा काढल्या असता त्या अबाउ‍त्र आल्या आहेत.सार्वजनिक बांधकाम विभागास जास्तीत जास्त ४.९९% अबाउत्र  दर मंजूर करता येतात दहा टक्के पर्यतचे निविदा मंजूरीसाठी शासनाची मंजूरी लागते त्यामुळे फेरनिविदा मागविल्या आहेत.

मा.सभापती साहेब :- कामे लवकारात लवकर व्हावयास हवे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- येणारे वाढीव खर्चास एकाच वेळी मंजूरी द्यावी  म्हणजे सदर प्रस्ताव सभे पुढे वेळोवेळी मंजूरी साठी सादर करणे टाळता येईल.

मा.सौ.खरपुडे ज.सु. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.श्री. शिंदे द.बा. :- मंजूर.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आयूर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर व सारसनगर येथील भिंगार नाल्यावर पुल बांधणे कामी येणारे वाढीव खर्च रूपये १६,२४,८२४/-( रूपये सोळा लाख चोवीस हजार आठशे चोवीस फक्ते)चे खर्चास व सदर रक्कम आवश्यकते नुसार  मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडेस वर्ग करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही  करणेत यावी.

सुचक :-  मा.सौ. खरपुडे ज.सु.

अनुमोदक :- मा. श्री. शिंदे द.बा.

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका